# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १५३

मा. प्राचार्य
सर्व संलग्न महाविद्यालये

विषय : सक्तीची आरोग्य सेवा योजना .

महोदय,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्ष विद्यार्थी तसेच वसतिगृह विद्यार्थ्यांसाठीची सक्तीची वैद्यकीय तपासणी अनिवार्य असून सदर योजना खालील मार्गदर्शक तत्वांप्रमाणे राबविण्यात यावी.

१. प्रथम वर्षात शिकणाऱ्या तसेच वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी अनिवार्य असून सदर तपासणी दरवर्षी दि. ३१ ऑक्टोबरपूर्वी करण्यात यावी.

२. योजनेची अंमलबजावणी सुलभ व्हावी यासाठी आरोग्य सेवा योजनेचे कामकाज महाविद्यालयातील एका अध्यापकांकडे सोपविण्यात यावे आणि व त्यांना योजनेचा संयोजक व पालक या नात्याने योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात यावी.

३. आरोग्य सेवा योजनेच्या अंमलबजावणीसाठी महाविद्यालयाने एक मानद वैद्यकीय आधिकारी (एम.बी.बी.एस) अथवा बी.ए.एम.एस.नामनिर्देशित करावा.

४. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी शक्यतो महाविद्यालयाच्या आवारात करण्यात यावी.

५. विद्यार्थीनींची वैद्यकीय तपासणी स्त्री डॉक्टरांकडून करण्यात यावी.

६. एकूण विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्यास (१०० च्या वर) मानद वैद्यकीय अधिकारी यांनी इतर स्थानिक डॉक्टरांच्या  साहाय्याने वैद्यकीय तपासणी पूर्ण करावी म्हणजे ती ठरलेल्या वेळेतच पूर्ण होईल.

७. महाविद्यालयांनी ठरविलेल्या वेळपत्रकानुसार विद्यार्थ्यांनी वैद्यकीय तपासणी करून न घेतल्यास प्रवेशपात्रतेचा दाखला मिळणार नाही. असे विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणावे.

८. वरिष्ठ महाविद्यालयातील प्रथम वर्ष तसेच वसतिगृहातील विद्यार्थ्यांकडून ''सक्तीच्या विद्यार्थी आरोग्य सेवा योजनेसाठी'' प्रतिविद्यार्थी रू. ६०/- (रू. साठ फक्त) इतके शुल्क आकारण्यात यावे व त्याचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात यावा :

(अ) रू. ६०/- पैकी रू. २०/- आरोग्य निधीसाठी विद्यापीठाकडे वित्त व लेखा आधिकारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे नावे डिमांड ड्राफ्ट काढून वैद्यकीय अधिकारी विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे-७ येथे ३० सप्टेंबरपूर्वी पाठवावा या रकमेचा विनियोग विद्यापीठ आधिकारी मंडळाच्या निर्णयानुसार गरजू विद्यार्थ्यांना औषधोपचारासाठी करण्यात येईल.

(ब) उर्वरित रू. ४०/- चा विनियोग-

१) वैद्यकीय तपासणी करणाऱ्या डॉक्टरांना मानधनापोटी प्रति विद्यार्थी रू. ३०/-

२) किरकोळ खर्चासाठी तसेच वैद्यकीय तपासणीसाठी काम करणाऱ्या महाविद्यालयातील सेवकांना मानधनापोटी विभागून अदा रू.१०/-